कार्यालय, पोलीस अधीक्षक, यवतमाळ
एल.आय.सी. चौक, ता. व जि. यवतमाळ पिन कोडः ४४५००१
Email:- sp.yavatmal@mahapolice.gov.in

# पोलीस शिपाई चालक भरती - २०२१

## गुणवत्तेनुसार प्रवर्गनिहाय तात्पुरती निवड यादीतील उमेदवारांची मुळ कागदपत्रे तपासणी

यवतमाळ जिल्हा पोलीस आस्थापनेवरील "**पोलीस शिपाई चालक**" यांची प्रवर्गनिहाय ५८ रिक्त पदे भरण्यासाठी पोलीस भरती प्रक्रिया सुरु असून " **सुधारित तात्पुरती निवड व तात्पुरती प्रतिक्षा यादी** " दिनांक २०.०४.२०२३ रोजी पोलीस अधीक्षक, यवतमाळ येथील पोलीस कवायत मैदान, पळसवाडी, दारव्हा रोड, यवतमाळ येथील नोटीस बोर्डवर तसेच या कार्यालयाचे संकेतस्थळावर https://yavatmalpolice.gov.in यावरही प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर पोलीस शिपाई चालक भरती-२०२१ प्रक्रियेतील तात्पुरत्या निवड यादीमधील उमेदवारांची मुळ कागदपत्रे पडताळणी ही **दिनांक २१/०४/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता प्रेरणा हॉल, पोलीस मुख्यालय, यवतमाळ येथे होणार आहे**. त्याकरिता तात्पुरत्या निवड यादीमधील ५८ उमेदवारांनी खालील कागदपत्रासह कागदपत्र पडताळणीसाठी वेळेत हजर राहावे.

## उमेदवारांसाठी सूचना

१. उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीला येते वेळी ऑनलाईन आवदेन अर्जामध्ये त्यांनी नमुद केलेली व आवश्यक ती सर्व मुळ (ORIGINAL) कागदपत्रे (१० वी, १२ वी उत्तीर्ण गुणपत्रक/सनद/टी.सी. व उच्च शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण प्रमाणपत्रे) सोबत घेऊन हजर राहाणे अनिवार्य आहे. (उदा. जन्म पुराव्यासाठी १० वी ची सनद, जात प्रमाणपत्र, जात वैधता, रहिवासी प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, वाहन चालक (LMV/LMV-TR) वैध परवाना, EWS प्रमाणपत्र व इतर प्रवर्गनिहाय आवश्यक असलेली सर्व मुळ प्रमाणपत्रे, नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र (सन २०२१-२२ सह दिनांक ३१.०३.२०२५ पर्यंतचे वैध असलेले व दिनांक १५.१२.२०२२ पर्यंत निर्गमित केलेले असावे.) खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता ३०% आरक्षणाच्या सवलतीकरिता उन्नत व प्रगत गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याबाबतचे परिशिष्ट "फ" प्रमाणपत्र) तसेच वरील सर्व मुळ कागदपत्रांच्या सुस्पष्ट २ साक्षांकित छायांकित प्रती सोबत घेऊन येणे अनिवार्य आहे.

२. उमेदवारांनी ऑनलाईन आवेदन अर्जाची कलर सुस्पष्ट साक्षांकित प्रत (त्यामध्ये Application ID नमुद असावा) सोबत घेऊन येणे अनिवार्य आहे.

३. उमेदवारांनी त्यांना शारीरिक चाचणी, कौशल्य चाचणी व लेखी परीक्षेसाठी देण्यात आलेले मुळ प्रवेशपत्र (त्यावर या कार्यालयाचा शिक्का असलेले) सोबत घेऊन येणे अनिवार्य आहे.

४. उमेदवारांनी ४ पासपोर्ट साईज फोटो घेऊन येणे अनिवार्य आहे.

५. उमेदवारांनी ओळखपत्र उदा. आधार कार्ड, पॅन कार्ड, इत्यादी पैकी सोबत घेऊन येणे अनिवार्य आहे.

६. उमेदवारांनी वर नमूद कागदपत्रे शिवाय इतर कोणतेही अनावश्यक साहित्य सोबत घेऊन येऊ नये

ठिकाण : यवतमाळ
दिनांक : २०/०४/२०२३

( डॉ. पवन बन्सोड )
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.